**प्रेस नोट** **दि. २७/०४/२०२६**

**<u>अंधेरी पोलीस ठाणेकडुन ड्रेनेज लाईनमध्ये कुजलेल्या अवस्थेत मिळालेले अनोळखी महिलेचे शव मिळाल्यापासुन २४ तासाच्या आतामध्ये त्याची ओळख पटवुन खुन करणाऱ्या दोन आरोपींना अटक करून खुनाचा गंभीर गुन्हा उघडकीस आणलेबाबत</u>**

दि. २४/०४/२६ रोजी १५.३० वाजताच्या सुमारास बृहन्मुंबई महानगरपालिकेचे कामगार यांनी अंधेरी पोलीस ठाणेस फोनदृवारे कळविले की, ते ड्रेनेजची साफसफाई करत असताना मुंबई इंटरनॅशनल एअरपोर्ट लिमीटेडच्या मोकळया जागेभोवती बांधलेल्या कंम्पाऊंड लगत असलेली बृहन्मुंबई महानगरपालिकेची ड्रेनेज लाईन, ओमनगर, मरोळ पाईपलाईन, अंधेरी पुर्व, मुंबई या ठिकाणी बंद मॅनहोलचे झाकण उघडले असता साधारण पाच ते सहा फुट खोल असलेल्या ड्रेनेज लाईनमध्ये कुजलेल्या अवस्थेत एक शव आढळुन आले असल्याचे सांगितले. मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलीस पथक हे तात्काळ घटनास्थळी रवाना करून पाहणी केली असता वर नमुद घटनास्थळी एका महिलेचे शव हे पुर्णपणे कुजलेल्या अवस्थेत असल्याचे दिसुन आले. सदर घटनेचे गांभीर्य ओळखुन त्याबाबत अंधेरी पोलीस ठाणेस अपमृत्यु क्र २२/२०२६ अन्वये नोंद करण्यात आला.तसेच शवाची ओळख पटविण्याकरिता मा.वरिष्ठांच्या सुचनेप्रमाणे परिमंडळातील एकुण नऊ पोलीस पथके तयार करून पश्चिम परिक्षेत्रातील परिमंडळ ०८,०९ व १० मधील पोलीस ठाणेस दाखल हरवलेल्या व्यक्तींची माहिती काढण्यात आली. मृतदेहावर मिळुन आलेले दागिने व इतर ओळख पटविण्याच्या बाबींच्या अधारे सदर महिलेची ओळख पटविली असता तिचे नाव ब्लान्स जेम्स सिक्वेरा वय ८० वर्षे, रा.ठि–खोली क्र १०,आलोक चाळ, मरोळ पाईपलाईन, टेक्निकल एरिया, अे के रोड, अंधेरी पुर्व, मुंबई असे असल्याचे निष्पन्न झाले तसेच त्याबाबत दिनांक १०/०१/२०२६ रोजी सहार पोलीस ठाणे, मुंबई येथे हरविलेली मोठी व्यक्ती क्र ०१/२०२६ अन्वये नोंद करण्यात आली असुन त्याबाबत तक्रार ही तिचा भाऊ जोसेफ थॉमस कोयलो याने दिली असल्याबाबत माहिती प्राप्त झाली. सदर मिळालेल्या माहितीच्या आधारे मयत महिला राहत असलेल्या परिसरात चौकशी केली असता मयत महिलेचे तिचा भाऊ जोसेफ थॉमस कोयलो व त्याची बायको मारिया जोसेफ कोयलो यांच्यामध्ये वारंवार भांडण होत असल्याचे तसेच मयत महिला हरविलेच्या एक दिवस आगोदर म्हणजे दिनांक ०९/०१/२०२६ रोजी मयत महिला हिचे तिचा भाऊ जोसेफ कोयलो व त्याची बायको मारिया कोयलो यांच्याशी जोरदार भांडण झाले असल्याबाबत तसेच त्याच दिवशीपासुन मयत महिला ही गायब झाल्याची खात्रीशीर माहिती प्राप्त झाली. एकंदरित मिळालेल्या माहितीच्या आधारे मयत महिलेचा भाऊ जोसेफ थॉमस कोयलो, त्याची बायको मारिया जोसेफ कोयलो व मुलगा काल्टन जोसेफ कोयलो यांना चौकशीकामी ताब्यात घेण्यात आले. त्यांच्याकडे मानवी कौशल्याच्या आधारे तपास करण्यात आला असता जोसेफ थॉमस कोयलो याने दि. १०/०१/२०२६ रोजी रात्री ००.३० वाजेच्या सुमारास त्याच्या मयत बहिणीच्या वारंवार होणाऱ्या त्रासाला कंटाळुन तिला जिवे ठार मारून पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने तिचा मृतदेह हा बंद मॅनहोलचे झाकण उघडुन ड्रेनेज लाईनमध्ये टाकला असल्याचे व त्यानंतर त्याने व त्याची पत्नी मारिया कोयलो यांनी कट रचुन सहार पोलीस ठाणे, मुंबई येथे मयत महिला ही हरवली असल्याबाबत खोटी तक्रार दिल्याचे निष्पन्न झाले. त्याआधारे अपमृत्यु तपासी अधिकारी पोलीस उप निरीक्षक संजय आकेलकर यांनी सरकारी पक्षातर्फे फिर्याद दिल्यावरून अंधेरी पोलीस ठाणे गुन्हा नोंद क्रमांक ३६३/२०२६ कलम १०३(१), २३८(क), २१७(क), ६१(२) भा.न्या.सं अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.तसेच सदर गुन्हयामध्ये जोसेफ व मारिया यांचा सहभाग निष्पन्न झाल्याने त्यांना नमुद गुन्हयामध्ये अटक करण्यात आली आहे.

**<u>अटक आरोपीतांचे नाव व पत्ता</u>**

१)जोसेफ थॉमस कोयलो वय ६५ वर्षे,रा.ठी– रूम नं १०, आलोक चाळ, मरोळ पाईपलाईन, अंधेरी पुर्व, मुंबई
२)मारिया जोसेफ कोयलो वय ६३ वर्षे, रा.ठी– रूम नं १०, आलोक चाळ, मरोळ पाईपलाईन, अंधेरी पुर्व, मुंबई

**तरी अत्यंत कुजलेल्या अवस्थेत मिळालेल्या अनोळखी महिलेच्या शवाची ओळख पटवुन मागील तीन महिन्यापासुन मिसिंग असलेल्या महिलेच्या खुनाचा गुन्हा उघड करण्याची उल्लेखनीय कामगिरी अंधेरी पोलीस ठाणेचे अधिकारी व अंमलदार यांनी पार पाडली आहे.**

सदरची यशस्वी कामगिरी मा. पोलीस आयुक्त बृहन्मुंबई श्री देवेन भारती, मा.पोलीस सह आयुक्त (का व सु) श्री. सत्यनारायण चौधरी, मा.अप्पर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग श्री परमजित सिंह दहिया, मा.पोलीस उप आयुक्त, श्री दत्ता नलावडे, परिमंडळ १०, मुंबई व मा. सहा. पोलीस आयुक्त, गजानन पवार, अंधेरी विभाग यांचे मार्गदर्शनाखाली व.पो.नि श्री उमेश मचिंदर, पो.नि. गुन्हे श्री विनोद पाटील यांचे प्रत्यक्ष देखरेखीखाली सपोनि मगर, गुन्हे प्रकटीकरण अधिकारी पोउपनि किशोर परकाळे, पोउपनि समाधान सुपे, पोउपनि संजय अकोलकर, स.फौ. पेडणेकर, पो.ह. शिंदे, पो.ह.पुजारी, पो.ह. कांबरी, पो.ह.घडवले, पो.ह गायकवाड, पो.शि.पाटील, पो.शि म्हात्रे, पो.शि लोंढे, पो.शि.गवळी, पो.शि शिंदे, पो.शि पाटील, पो.शि तिघोटे, पो.शि टरके, पो.शि घुले, पो.शि नरबट, पो.शि मोरे, व पो.ह विशाल पिसाळ (तांत्रिक मदत) यांनी पार पाडली आहे.

..............................